(Marathi)

1045
9121

15.30

10

P

श्रीबजरंग



# पंजाबचा सिंह

## लाला लजपतराय यांचा पोवाडा

व

## धेनुसंदेश.

—प्रकाशक—

गणेश विश्वनाथ दामले, पुणें.

१९३०.

किंमत १ आणा.

1530
mar

प्रकाशक;
गणेश विश्वनाथ दामले.
५४१ रविवार पेठ भाजीआळी,
पुणें शहर.

IMPERIAL RECORD DEPARTMENT
RECEIVED.
3 - FEB. 1931

आवृत्ती दुसरी

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No 1530
Date 17-1-72
GOVT. OF INDIA

मुद्रक,
नारायण बळवंत चव्हाण.
हरिहर छापखाना,
४८३ शनवार, पुणें २.

# पंजाबचा सिंह

## लाला लजपतराय यांचा पोवाडा व धेनुसंदेश.

**कवि दास विट्ठ कोल्हारकर.**

चाल—राजहंस.

दुमदुमवुनि जगदारण्यां पंजाबि केसरी गेला ! धृ !

जागरनग्रामिं जागृतिच्या । जातिवंत जन्मा आला ।
जागृती अहोरात्रींची । राखियली अंतर्यामीं ।
ती विद्यार्जनिं सावधता । कार्यक्षम होण्यासाठीं ।
कुहरांतुनि निज जन्माच्या ।
लीलेस्तव बाळपणींच्या ।
उडि घेई हिस्साराच्या ।
काननांत केसरिछावा । गर्जना करूं सरसावला ॥ १ ॥

हिः सारी हित साधाया । उमगला स्वीय देशाच्या ।
उत्तिर्ण कायद्याभ्यासीं । होतांच उसळला वेगीं ।
चैतन्य नव्या रक्ताचें । सळसळें नव्या उत्साहें ।
चाल लाहोरपुरी मर्दांची ।

मल्लांच्या आखाड्याची ।
वीरश्री जन्मायाची ।
व्यसनेषुसख्य न्यायाला । सिंहांत सिंह तो रमला ॥२॥

राजकारणपटुनरवीर । चमकला प्रथम सुरतेंत ।
गर्जना नव्या जोमाची । दुमदुमे भरत खंडांत ।
उरि धडकी पाश्चात्यांच्या । भंय लागे इंग्लडांत ।
चाल धन्य सिंह पंजाबाचा ।
चहुं खंडीं बदली वाचा ।
फडफडला ध्वज कीर्तीचा ।
साजला शोभवी विमला । पंजाबि तेज गगनाला ॥३॥

धुकांचे डोळे दिपले । बोचलें शल्य हृदयाला ।
सैतानी धुडगुसाला । पायबंद पाश्चात्यांला ।
ही लगाम तत्काति । तोंडा भापली शत्रु नवझाला ।
चाल काढाया कांटा त्याचा !
टाकला डाव पेंचाचा !
नच गुन्हा हद्दपारीचा !
कोंडला सिंह पंजाबी । ब्रह्मदेशीं अततां गेला ॥४॥

आतीचा सिंह पंजाबी । खवळला वीर तो अधिक ।
साहुनी त्रास अनिवार । गर्जला पुन्हा हुंकार ।

दुमदुमला भारत खंड । हादरलेंच जगत प्रचंड ।
चाल नजरेनें दुष्टाव्याच्या
द्वेषाग्नि पोटिं दुष्टांच्या ।
जातिच्या पशू अधमाच्या
धुमसला पुनः गिवसीला । घातले बंदि सिंहाला ॥ ५ ॥

चोराला चोर दिसावा । न्याय हा जगताचा रास्त ।
अंमरिकीं असतां सिंह । माणभुस येऊं न देत ।
जाहली हद्दपारीची । शिक्षा ही उमगते नीत ।
चाल न्यायाची बोंबाबोंब !
रावणी राज्य ही चांग ।
वाढते वदत जनसांग ।
अन्याय चहुकडे भरला । अन्यायें भारत गिळिला ॥ ६ ॥

काजवा ! शिपुर्डा काठें । तें कोठें सूर्य लालजी ।
हें तुकड्यावरचें श्वान । ते सिंह कुठें लालजी ।
पार्थिच्या पाय पोसाची । लायकीहि नाहीं ज्याची ।
चाल ॥ सिंहास मारणें त्यानें । वीरेंद्रें डोळा बघणें ।
अजुनीहि शांतिते स्मरणें ।
व्हा ! उठा ! फेर हल्ल्याला सिंह तो वदोनी गेला ॥७॥

मुक्काम कापरगांव
२१-११-२८

'वज्रपर्णम्'

४

# भिकारी.

कवि दास विठ्ठ कोल्हारकर

( चाल ---हा हिंद देश माझा. )

भाग्यांत भाग्यवंत, कवी एकला भिकारी ध्रु•
द्रव्यास कोण खातो, खातात अन्न सारे
मानार्थ द्रव्य अर्ता, जनता करी विचारी १
व्यवहार या जगाचा, द्रव्यांत व्हावयाचा
तरि काय कोण मेले, उपवासी ते भिकारी २
संसार थोर माझा, पुरतेन त्यास जागा
लोकत्रयीं पसारा, परि मी जगी भिकारी ३
श्री देवी शारदेची, कन्या कुला शिलाची
प्रतिभाभिधानीसाची, मत्पत्नीमी भिकारी ४
कोठार कल्पनेचे, ब्रह्मांडी मत्सदाचे
अविनाशि संपदेचे, ऐसा असे भिकारी ५

* * *

स्थित्यंतरे जगाची, घडतात जीं सदाची
सकलास दृश्यसारे, परी ना कळे खुमारी ६

खुलता निसर्ग फुलते, श्रीसृष्टिदेवी हंसते
गालीं गुलाबी रमते, छबि तीच गोड भारी ७
तजस्वि दिव्य वीज, घनघोर मेघनाद
हरिचाए चांदण्या त्या, सजविती सृष्टि सारी ८
निजगीत घुमवी सरिता, जी जीववीत जगता
सौंदर्य तेची चित्ता, भिडते कुणा जी व्हारी ९
रणशौर्य सद्भटांचें, मधुगीत कोकिलांचे
नवदृश्य नवमनूचे, गमते कुणा बहारी १०
सौंदर्य भाव वरचा, होज्ञांत सर्व जगता
परि कोण भेदि चित्ता, हृदगौप्य स्फोटकारी ११

* * *

दृष्टानृ लोकभानू, परि तोहि जे न जाणू
शकतो तयास वर्णू, व्हदंग कवि चितारी १२
नैसर्गी दृश्य सुक्ष्म, वाक् कोंदना करोन
लौकैक्षि दे भरोन, स्वगुणे खरा भिकारी १३
सत्यास सत्य बोले, सद्धर्मी रंगलेले
सद्गुणी वाहिलेले, काव चित्त निर्विकारी १४
कर्तव्य एक ठावें, जनतेस जागवावें
ध्येयार्थ फिरावे, देशी ह्मणो भिकारी १५

निःस्वार्थसा भिकारी, लावी जना पुढारी
पेशा स्वये स्विकारी, व्यवहारिचा भीकारी १६
औदार्य पूर्ण चित्त, आनंद मग्न नित्य
आदर्श लोकी होत, जन दृष्टिचा भिकारी १७
धर्मार्थिचा भिकारी, कर्मार्थिचा भिकारी
देशार्थिचा भिकारी, श्रीमंती ? त्या कुबेरा १८
गंगाजळी कविंची, नाविन्य कल्पनेची
जी मूर्त मोदवीची, कवि केवी हो भिकारी १९
जनता जनार्दनाला, लावी डुलावयाला
वेधोनी तन्मनाला, कवि एक तो भिकारी २०
वेदान्तदे अमिरी, परधर्मिची फकिरी
जनदास्य कामगिरी, राहो सदा भिकारी. २१

# गाईचा आक्रोश.

श्रीराम जयराम जयजयराम

गाईत्रीची विनंति ऐका तुम्ही सर्वजन। तुम्ही सोडवा कसाबलोकापासून ही मान। माझ्या दुधानें तुम्ही लेकरे करितां जतन। लहानाचे मोठे जाहला माझ्या दुधानें। माझ्या बाळाच्या मारूनी तोंडांत ठेविता बांधून। मनास वाटेल तेवढें दूध तुम्हीं घेतां काढून। दही, दुध, तुप, लोणी खाता तुम्ही आनंदानें। मोठमोठया मेजवान्या तुम्ही करिता हौसेनें। अंतकाळाचे वेळीं दुध तुम्ही पाजिता शिरीनें। तुमचा आत्मा शांत होतो माझ्या दुधानें। आपण दोघे मायलेकरें पहा विचार करून। तुम्ही सोडवा कसाबलोकांपासून ही मान।

१

तुमचे शेतीं माझी लेकरें करिती मेहनत। हाणून मारून बळेंची त्यांचे तुम्ही धरिता औत। गाडी जंपुनी शेता-मध्यें घालीता माझें खत। पाळी पेरणी करून पिकें तुम्ही आणीता बहुत! अठरा धान्यें पिकवून तुम्ही भरता घरांत। तुमची मुलें लेकरें बसोनी खाती आनंदांत। असेहो असतां कसे हो तुम्ही बैमान। तुम्ही सोडवा कसाबलोकांपासून ही मान।

२

माझे हाल मी तुम्हा सांगते ध्या कानावरी । बारा गाईची सांगड बांधुनी नेतो आपुल्या घरी । चारापाण्याची ओळख नाहीं मारितोही भारी । थोडया बाजूला जावें तरहो काठी पाठीवरि । हाणीत मारीत हाल करित नेतो स्टेशनावरी आगगाडीला पाहुनी जीव आमचा भीतो भारी । डब्यामध्यें कसाब घालून । जातो माघारीं । दोनचार दिवस डबा सुटोनी राहतो स्टेशनावरी । उभा राहाण्याला जागा नाहीं दाटी होते सारि । थरथर कापून पडतो आम्ही एकमेकावरि । महादुःखामधे लोटून कैसे होत कठीण तुम्ही सोडवा कसाब लोकापासून ही मान ।

३

गाडी हालली निघून चालली थेट मुंबईला । बोरीबंदरि उतरूनी मजला नेले अडयाला । तिथला व्यापारी कसाब त्याचा सौदाही झाला । हजार पांचशे गाई घेउनी नेतो बांदऱ्याला । एका वाडयामध्यें कोंडून ठेवितो कुलुप लावी त्याला । चवथें दिवशीं बाहेर काढी तो अखेर दिवसाला । पाणी पाणी करून प्राण कासावीस झाला । हंबरडा फोडीते परंत दया नाहीं त्याला । कसाबानें सुरी येउनी घातला की सल्ला । प्राण जाताना विकणाराला शाप मीं दिधला । दास लालाभाई विनंती करितो अंतरि ठसून । पुणें जिल्ह्यामधें राहणें त्याचे सनसर ठिकाण.

१

## हंबरडा.

[ श्री गोपालकृष्णाची आवडती गाय, जिचा करुण हंबरडा ऐकून श्री शिवाजी महाराज अवतरले. आबालवृद्धांस दूध पाजून पुष्ट बनविणारी अशी एक गोमाता तिच्याच धन्यानें कसायाला विकली त्या कसायानें तिचा वध केला असतां एकदम आकाशवाणी झाली. ]

चाल—उधवा शांतवन.

हंबरडा कानीं आला— झणि धाव धाव गोपाळा !
गोमाय आसवे ढाळी— दुःखाचे सोडी श्वास
हंबरणे केविलवाणे— पाझरवी पाषाणास
शोकाला फुटली वाणी— तिजसवें रडे आकाश
झणि धाव धाव गोपाळा
नच वाली कोणी मजला
वाचीव गरीब गाईला
तूं नको उपेक्षूं मजला— झणि धाव धाव गोपाळा ! १

पाळिलें पोषिले जेणें— दुःखार्णविं मज तो लोटी
प्रेमाची त्याची दृष्टि— कां आज होइ उफराटी
निष्ठुरता वेल विषारी— ये कशी दयेच्या पोटीं
अपराध काय मी केला
पाषाण हृदय धनि झाला

खाटिकास विकले मजला
कां दीनेवरी तो रुसला— म्हणि धाव धाव गोपाळा ! २

रानचे खाउनी काटे— गिरिदरीचें पाणी प्यालें
खरकटें शिळें खाऊन— मी दूध तयाला दिधलें
पाऊस उष्ण वाशीत— केव्हां न मनीं मी गणिलें
हंबरलें पाहुनि त्यास
पान्हवलें धरितां कास
ते दूध नव्हे पीयूष
मी प्रेमें दिधलें त्याला— म्हणि धाव धाव गोपाळा ! ३

मम समाधान जीवींचें— दुग्धात ओतुनी सकल
कल्याण चिंतिलें त्याचें— जाणतो कृष्ण गोपाळा
मी मूक जनावर मजला— नच ठावा शाब्दिक खेळ
परि कृतज्ञता मन्मनींची
दृष्टींत घातली साची
तो नित्य तियेला वाची
परी फळ हें असलें तिजला—म्हणि धाव धाव गोपाळा ४

मम तान्हें गोजिरवाणें— मी नसतां काय करील
हंबरेल आनंदानें— जधिं होईल सायंकाळ
पडसाद न पडतां कानीं— परि हंबरडा फोडील
दिसणार नाहिं मी त्यास
तोडील साच दाव्यास

त्या बसेल कां गळफांस
हे नको कल्पना मजला— झणि धाव गोपाळा ५
पाजील तयाला कोण !— राहील काय उपवासी
चाटणेंचि माझें व्हावें— त्या नको नको तृणराशी
काळोख घोर हा झाला— वाटेल काय भय त्यासी
मी त्याचे जवळी नसतां
त्या नसे तिमिरभेसुरता
विनविते तमा तुज आतां
सांभाळ रात्रीं मम बाळा—झणि धाव धाव गोपाळा ! ६
तें हंबरतां धांवेल— मालकीण माझी सदय
मातेच्या हृदया ठावें—तान्हियास व्हावें काय
कुरवाळिल माझ्या बाळा— ती नाहीं नाहीं अदय
तें मुखाकडे पाहील
ढळढळा अश्रु ढाळील
हंबरून हेंच वदेल
जा आण मम आईला— झणि धाव धाव गोपाळा ७
ढाळील आसवें मात्र— ती मजसम मूक बिचारी
अबलांना अश्रुवीण— द्यावया न शक्ति दुसरी
अश्रूंत घालुनी हृदय— भिजवील भूमिही सारी
पाहून अश्रु अबलांचे

ऐकून दुःख दीनाचें
सांडता रक्त गाईचे
द्रव येईल कां कोणाला— झणे धाव धाव गोपाळा ! ८

खाटीक तोंच कृतांत— पातला सुरा घेऊन
हंबरडा फोडी दीर्घ— गोमाय तपा पाहून
ओरडली किंचाळून— सोडवील मजला कोण
ये धावत तान्हुकल्या रे
मज भेट एकदा तरि रे
तव माता तुज मुकली रे
चालेल.........झणि धांव धांव गोपाळा ९

चालता सुरा दुष्टांचा— ध्वनी उठे तेथ कोठून
संतान भरतभूमीचे— जाहले कसे नादान
सामर्थ्य न ज्यांच्या अंगीं— वाचवावया गोप्राण
ते देश कसा उद्धरिती
ते स्वराज्य कैसें घेती
ते स्वतंत्र कैचे होती
पारतंत्र्य त्यांच्या भाळा— जागती न जे धर्माला १०

के. ल. टेंभूर्णीकर.

हरिहर प्रेस,
शनवार पेठ,
पुणें नं.२